**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०२ जुलै २०२६**

**ठळक बातम्या**

1. **केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या हस्ते विकसित भारत जीरामजी योजनेचं औपचारिक उद्‌घाटन.**
2. **शेती आणि गैरव्यवसायिक कामासाठी गौण खनिजाचा वापर करण्यासाठी स्वामित्व शुल्क माफ करण्याची महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा.**
3. **वाशिम जिल्हयातील रिसोड पोलीस कोठडी मृत्यू प्रकरणाचा १५ वर्षांनंतर निकाल; ठाणेदारासह नऊ पोलिस कर्मचाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा.**
4. **गडचिरोलीत वीज कोसळून एकाचा मृत्यू; विदर्भात आज सर्वत्र पावसाचा इशारा.**

-------------------------------------------

विकसित भारत जी राम जी

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते आज आंध्र प्रदेशाच्या तिरुपती जिल्हयात विकसित भारत जी राम जी योजनेचं औपचारिक उद्‌घाटन झालं. मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण हे ही यावेळी उपस्थित होते. यावेळी लाभार्थींना जी राम जी कार्डांचं वाटप करण्यात आलं. तसंच जी राम जी पोर्टलचं उदघाटनही झालं. जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेणारा हा कायदा कालपासून देशात लागू झाला आहे. मनरेगा आणि व्हीबीजीरीमजी योजनेतला फरक सांगताना कृषीमंत्री चौहान यांनी सांगितलं-

**(होल्ड बाईट- शिवराजसिंग चौहान ३२ सेकंद)**

-------------------------------------------

जी राम जी

बुलढाणा जिल्हयातील ८७० ग्रामपंचायतच्या माध्यमातून  व्हीबी-जी राम जी'  या योजनेअंतर्गत विविध कामे प्रस्तावित करण्यात आली असून खामगाव तालुक्यातील दुर्गम आणि डोंगराळ भागात वसलेल्या घारोड या गावामधून या योजनेच्या कामाला सुरुवात झाली. गावातील स्मशानभूमी परिसरामध्ये एकाच वेळी २५० वृक्ष लागवडीला सुरुवात झाली असून डोंगराळ भागातील विविध शासकीय जमिनीवरही मोठ्या

प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात येणार आहे. या माध्यमातून मजुरांना रोजगार उपलब्ध होत असल्यानं आनंद व्यक्त होत आहे. त्याच प्रमाणे यवतमाळ आणि भंडारा जिल्हास्तरीय कामांना सुरवात झाली आहे

-------------------------------------------

विधिमंडळ

राज्यात विकसित भारत जी राम जी योजना लागू झाल्यानंतर ती सुलभ पद्धतीने राबवण्यासाठी, त्याचप्रमाणे जुन्या योजनेतील काही बाबी यातही समाविष्ट करण्यात आल्या असून त्या कशा प्रकारे अमलात येतील हे समजावून सांगण्यासाठी राज्यस्तरावर आमदारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. याशिवाय प्रत्येक जिल्हा स्तरावर देखील ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य यांच्या साठी अशीच कार्यशाळा आयोजित करण्याचे निर्देश दिले जातील अशी माहिती प्रभारी मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. ऐकुया आजच्या विधी मंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

***(व्हॉइस कास्ट)***

***शेती आणि गैरव्यवसायिक कामासाठी गौण खनिजाचा वापर करण्यासाठी स्वामित्व शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या गौण खनिजाचा वापर शेती, शेतघर, शेत रस्ता दुरुस्ती, गोठा वगैरे गैरव्यवसायिक कामासाठी करता येईल अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. यासाठी शेतकऱ्यांना मंडळ अधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल आणि १५ दिवसात त्यांना मंजुरी मिळेल, असं बावनकुळे यांनी सांगितलं. अकोला पश्चिमचे काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांना काल फोनवर बिश्नोई टोळीने जीवे मारण्याची धमकी दिली. विरोधी पक्षांनी हा मुद्दा विधान सभेत उपस्थित केला आणि राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेवर चिंता व्यक्त केली. संबंधित सदस्यांच्या संरक्षणाचा आढावा घेण्याचं काम सुरू असून याप्रकरणी पोलीस आयुक्त गरजेनुसार संरक्षण पुरवतील असं आश्वासन प्रभारी मंत्री शंभूराज देसाई यांनी दिलं. यानंतर शेतकरी आत्महत्येच्या मुद्द्यावरचा स्थगन प्रस्ताव नाकारल्याबद्दल विरोधी पक्ष सदस्यांनी नाराजी व्यक्त करून सभात्याग केला. यवतमाळ जिल्ह्यात माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनेक वर्षं भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या न दिल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्याचं निलंबन करायची घोषणा गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत केली. किरण सरनाईक यांनी***

*याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. शालेय विद्यार्थ्यांना गणवेश किंवा इतर शैक्षणिक साहित्य शाळेच्या भांडारातून किंवा संस्था अथवा शाळा सांगेल त्या विशिष्ट दुकानांमधून खरेदी करण्याची सक्ती होत असल्याच्या तक्रारींमध्ये तथ्य आढळल्यास संबंधित शाळेवर कारवाई करायचे निर्देश १५ एप्रिल रोजीच्या परिपत्रकात दिले आहेत, अशी माहिती पंकज भोयर यांनी दिली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषा भवनाचं काम वेगाने सुरू असून डिसेंबर २०२७पर्यंत त्याचं काम पूर्ण होईल, तसंच ऐरोलीत भाषा उपकेंद्राचं कामही प्रगतीपथावर आहे, अशी ग्वाही मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. विधानपरिषदेत अर्धा तास चर्चेवेळी ते बोलत होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या नावाने नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, पुणे, कोल्हापूर आणि रत्नागिरी या पहिल्या ८ ठिकाणी मराठी भाषा विकास केंद्रं स्थापन करायचा निर्णय सरकारने घेतला असून एका वर्षात त्याची अंमलबजावणी होईल, अशी माहिती त्यांनी दिली. वेरूळ इथले शिक्षक सुरेश बोरसे यांना वैजापूरचे तपास अधिकारी आणि इतरांनी जबर मारहाण केल्याच्या आणि या घटनेत त्यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी दोन पोलीस कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित करण्यात आलं असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत लेखी निवेदनात दिली. विक्रम काळे आणि इतरांनी याबाबतची लक्षवेधी सूचना मांडली होती. या प्रकरणी एकंदर ८ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून ७ आरोपी अटकेत आहेत, असंही त्यांनी सांगितलं. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी नम्रता फलके)*

-------------------------------------------

विधीमंडळ महिला शेतकरी

महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकाच्या माध्यमातून कोणाच्याही जमिनीच्या मालकी हक्कात बदल करण्याचा सरकारचा प्रयत्न नाही. केवळ त्यांच्या हक्काला, श्रमाला ओळख देण्याचा हा प्रयत्न असल्याचं प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज विधानसभेत केलं. या विधेयकावरच्या चर्चेत त्या बोलत होत्या. हे विधेयक वारसा, उत्तराधिकारी, मालमत्तेसंदर्भातल्या विद्यमान कायद्यात बदल करत नाही. केवळ महिलांच्या कृषी क्षेत्रातल्या योगदानाला कायदेशीर मान्यता देण्याचा प्रयत्न असल्याचं त्या म्हणाल्या. संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून जाहीर केलं आहे. अशावेळी महिला शेतकऱ्यांना कायदेशीर

ओळख देण्याचा प्रयत्न करण्यासाठी प्रयत्न करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी चर्चेला सुरुवात करताना सांगितलं.

-------------------------------------------

पोलीस कोठडी मृत्यू

वाशिम जिल्ह्यातील रिसोड पोलीस कोठडी मृत्यू प्रकरणात तब्बल १५ वर्षांनंतर न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला आहे. २०११ मध्ये कोठडीत मृत्यू झालेल्या बेंग्या पवार प्रकरणी तत्कालीन ठाणेदारासह नऊ पोलिस कर्मचाऱ्यांना वाशिम जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. सीआयडी चौकशीनंतर दाखल झालेल्या गुन्ह्यात न्यायालयाने हा निर्णय दिला असून, पवार कुटुंबाला दीर्घ प्रतीक्षेनंतर न्याय मिळाला आहे.

-------------------------------------------

NCMC स्मार्ट कार्ड

एसटीच्या NCMC स्मार्ट कार्डला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, ३० जून अखेर ६२.८६ लाख प्रवाशांनी नोंदणी केली आहे, तर ३५.५२ लाख कार्डे सक्रिय करण्यात आली आहेत. १ ऑगस्ट २०२६पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी NCMC स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र प्रवाशांनी लवकरात लवकर नोंदणी करण्याचे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलं आहे.

-------------------------------------------

कर्जमुक्ती योजना

राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' च्या प्रक्रियेला गती आली असून, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत एकूण ६४ हजार ८६५ खातेधारकांची माहिती योजनेच्या अधिकृत पोर्टलवर यशस्वीरीत्या अपलोड करण्यात आली असल्याची माहिती सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी दिली.

दिनांक २ जुलै २०२६

-------------------------------------------

पाणंद रस्ते

मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघांसाठी एकूण ३६ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून जिल्ह्यातील शेत आणि पाणंद रस्त्यांच्या विकासाला गती मिळणार आहे. राळेगाव, आर्णी आणि उमरखेड मतदारसंघांना प्रत्येकी ७.५० कोटी रुपयांचा सर्वाधिक निधी मंजूर झाला आहे. जिल्ह्यातील ८ हजार ७६७ शेत पाणंद रस्त्यांना प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिली.

-----------------------------------------

सफाई कामगारांना मारहाण

अमरावती शहरातील द्वारका नगर परिसरात कर्तव्य बजावत असलेल्या महानगरपालिकेच्या दोन सफाई कामगारांना मारहाण झाल्याच्या निषेधार्थ सफाई कामगारांनी कामबंद आंदोलन पुकारल. गाडगे नगर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. आरोपींवर कठोर कारवाई होईपर्यंत कामावर परतणार नसल्याचा इशारा आंदोलकांनी दिला असून, पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू आहे.

-----------------------------------------

चंद्रकांत पाटील

समाज परिवर्तनासाठी थोर महापुरुषांच्या जीवनप्रवासाचे आणि कार्यकर्तृत्वाचे सखोल संशोधन होणे आवश्यक असून, चरित्र-साधने प्रकाशन समित्यांनी नवीन साहित्यनिर्मिती करताना समाजोपयोगी आणि संशोधनाधिष्ठित साहित्याला प्राधान्य द्यावे, असं प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलं. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि महात्मा जोतिराव फुले चरित्र-साधने प्रकाशन समितीची आढावा बैठक आज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ इथं पार पडली. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याला महाराष्ट्रासह देशभरातून मोठी मागणी असून सध्या हे खंड उपलब्ध नसल्याने पुनर्मुद्रणाची आवश्यकता असल्याचं बैठकीत नमूद करण्यात आलं.

-----------------------------------------

हवामान

हवामान - विदर्भात कालपासून अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस होत आहे. गडचिरोली जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं

असून, चामोर्शी तालुक्यातील रेगडी इथं मासेमारीसाठी गेलेल्या ५५ वर्षीय व्यक्तीचा वीज कोसळून मृत्यू झाला. बोरी-आलापल्ली मार्गावरील मुत्तापूर इथला तात्पुरता रपटा वाहून गेल्यान वाहतूक विस्कळीत झाली, तर चामोर्शी-गडचिरोली मार्गावर चिखलात दोन ट्रक उलटले. दरम्यान, मागील २४ तासांत भामरागड तालुक्यात सर्वाधिक ७२.७ मिमी पावसाची नोंद झाली. तत्पूर्वी, अमरावती जिल्ह्यात २९ आणि ३० जून रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे चांदूरबाजार आणि तिवसा तालुक्यांत मोठ नुकसान झाल आहे. पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने चांदूरबाजारमध्ये दोघांचा, तर नदीत बुडाल्याने तिवसा तालुक्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. याशिवाय ७० घरांचे आणि पशुधनाचेही नुकसान झाले असून शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. नागपूर शहरात आज दिवसभर पावसाची रिप रिप होती. आज नागपूरसह विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान आज सकाळपर्यंत झालेल्या पर्जन्यवृष्टीच्या नोंदीनुसार सर्वाधिक 70 मिलिमीटर पाऊस नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात तर 68. 6 मिलिमीटर पाऊस वर्धा जिल्ह्यात आणि 57 मिलिमीटर पाऊस बुलढाणा जिल्ह्यात पडल्याची नोंद आहे. विदर्भात येत्या काही तासात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि यवतमाळ जिल्ह्यात मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता असून या ठिकाणी वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर वर्धा आणि गोंदिया जिल्ह्यात तुरळ ठिकाणी वादळी पर्जन्यमानासह हलका पाऊस पडू शकतो.

------------------------------------------